सोमवार दि.१० फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४५ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# स्वामींच्या कृपेने माझ्यावर पर्यावरण खात्याची जबाबदारी:मी श्रद्धाळू,पण अंधश्रद्धाळू अजिबात नाही

## दिंडोरी आश्रम भेटीनंतर पंकजा मुंडेंची प्रतिक्रिया

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नाशिक (वृत्तसंस्था)**

स्वामींच्या कृपेने मला पर्यावरण खात्याची जबाबदारी मिळाली. मी श्रद्धाळू आहे, पण अंधश्रद्धाळू अजिबात नाही. गणपती दूध पितो असल्या अंधश्रद्धांवर माझा विश्वास नाही. आपण विज्ञानाशी सांगड घातली पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या. पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी आज दिंडोरी येथील अण्णासाहेब मोरे म्हणजे गुरु माऊली यांच्या आश्रमाला भेट दिली असता त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी बोलताना नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभवरही भाष्य केले.

नाशिक येथील स्वामी समर्थ केंद्र प्रणीत जागतिक कृषी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला पंकजा मुंडे यांनी हजेरी लावली. पंकजा मुंडे यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावल्याने अनेक तर्क वितर्क लावले जात आहेत. कारण सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड आणि विष्णू चाटे फरार असताना दिंडोरी येथील स्वामी समर्थ केंद्रात गेल्याचा आरोप भूमाता ब्रिगेडच्या प्रमुख आणि सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी केला होता. त्यातच आज पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे नाशिकच्या दौऱ्यावर असून स्वामी समर्थ केंडरच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली आहे.पर्यावरण खात्याची जबाबदारी माझ्यावर



स्वामींच्या कृपेने पडली आहे. मी अंधश्रद्धाळू अजिबात नाही माझ्या बाबांचा गणपती दूध पेत नव्हता मी श्रद्धाळू आहे. स्वामींची कृप महादेवाचे वाहन नदी, ज्या देवांचा विचार करतो प्रत्येक देवाण मागे प्राणी असतात. विज्ञानाशी सांगड घातली पाहिजे. सोन्याच्या मोहरा पुढच्या पिढी साठी काम येणार नाही. तहान लागल्यावर पाणीच लागेल, असे पंकजा मुंडे माध्यमांशी बोलताना म्हणाल्या.

पंकजा मुंडे यांनी यावेळी महाकुंभ मेळ्यावरही प्रतिक्रिया दिली. प्रयागराजमध्ये कुंभ आहे. त्या ठिकाणी अनेक तपस्वी आहेत. आधी त्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी तिथे जायचे, आता कुंभ पाहायला जातात. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभला थोडी जबाबदारी आली, असे त्या म्हणाल्या. कुंभमध्ये आपल्याला चांगले काम करायचे आहे. गो मातेचे संवर्धन करायचे आहे. बांधकाम करण्याआधी माझ्या परवानगी लागते, बांधकामाच्या आधी त्या ठिकाणी झाडे लावा, असा इशारा पंकजा मुंडे यांनी बिल्डर लोकांना दिला.आपण ज्या भूमिकेतून काम करतो, ती जगाला दिली पाहिजे. मला अगोदर प्रश्न पडला पर्यावरणात कसे काम करावे. माझ्या या सर्व कार्यात स्वामींचा आशीर्वाद पाठीमागे राहील. चांगले कामाच्या पाठीमागे उभे राहण्याचा वारसा आम्हाला मिळाला आहे. अशा कार्यक्रमांमध्ये उपक्रमांमध्ये मी नेहमीच आपल्याला दिसेल, असेही पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# वाघाळा येथील आश्रमशाळेतील सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्हयातील वाघाळा येथील माताजी शिक्षण संस्था संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील बाधित विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी कळविले आहे.यासंदर्भात प्रशासन पूर्ण लक्ष ठेवून असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त समाज कल्याण शिवानंद मिनगिरे यांनी दिली आहे.


जिल्हयातील वाघाळा येथील माताजी शिक्षण संस्था संचालित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील निवासी ८ १० विद्यार्थ्यांना आज सकाळी ९ वा. जेवण केल्यानंतर उलटी व मळमळ होत असल्याचे जाणवले.या विद्यार्थ्यांवर लगेच नांदेड येथील शासकीय वैद्यकिय रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती आता धोक्याबाहेर असल्याची माहिती तेथील डॉक्टरांनी दिली आहे. आश्रमशाळेतील शिक्षकांनी सर्व ५९ विद्यार्थ्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालय विष्णपुरी नांदेड येथे दाखल केले आहे. या विद्यार्थ्यांची इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक शिवानंद मिनगीरे यांनी भेट घेऊन प्रकृतीबाबत संबंधित डॉक्टरांची प्रत्यक्ष चर्चा केली. विद्यार्थ्यांची प्रकृती सुस्थितीत असून त्यांना वैद्यकीय निगराणीखाली ठेवण्यात आल्याची माहिती वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली दिली असल्याचे श्री. मिनगिरे यांनी स्पष्ट केले आहे.

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा दानापूर येथे इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षा सुरळीत

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

आज दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे आयोजित,जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा दानापूर तालुका भोकरदन येथे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता पाचवी २०२५ ही परीक्षा घेण्यात आली, परीक्षेमध्ये एकूण ९१ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ट झाले होते, त्यामध्ये मराठी माध्यमाचे ७७ विद्यार्थी आणि उर्दू माध्यमाचे १४ विद्यार्थी होते, या परीक्षेमध्ये दोन पेपर



असून त्यापैकी पहिला पेपर भाषा व गणित हा १५०गुणांसाठी चा त्याचा वेळ ११ ते १२:३० असा होता व दुसरा पेपर तृतीय भाषा व बुद्धिमत्ता चाचणी असून तोही १५० गुणांसाठीचा व दुपारी दोन ते साडेतीन ही दुसऱ्या पेपरची वेळ होती, या परीक्षेसाठी श्री टी एस लोखंडे सर हे केंद्रसंचालक तसेच चार पर्यवेक्षक व एक शिपाई यांच्या सहकार्याने ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यात आली.

# विद्यार्थ्यांना फळे व मिठाई वाटुन माता रमाई आंबेडकर जयंती साजरी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच या सामाजिक संघटनेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शंकर नगर तालुका बिलोली येथील शासकीय रुग्णालयात व रामतीर्थ जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना फळे व मिठाई वाटप करून त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

प्रथम त्याग मूर्ती, करुणेचा महासागर माता रमाई आंबेडकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच चे संस्थापक अध्यक्ष भास्कर भेदेकर , डॉक्टर बोरसे व जयदीप कांबळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच चे सचिव सुनील कांबळे , फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच चे उपाध्यक्ष गौस भाई शेख, उपसरपंच नागसेन जिगळेकर , ब्रह्मा कांबळे, निळकंठ तरटे, जयदीप कांबळे,शेषराव गावंडे,राहूल गायकवाड, मुनेश्वर सोनकांबळे, अलकेश कासराळीकर,लतीफ शेख,आशीफ शेख,गौतम कांबळे,आकाश कांबळे, वैभव कांबळे, बाबु सोनकांबळे यासह फुले शाहू आंबेडकर क्रांती मंच चे पदाधिकारी कार्यकर्तेउपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागसेन जिगळेकर यांनी केले. तर आभार गौस भाई शेख यांनी मानले.

# शिक्षक सेनेच्या राज्य अधिवेशनात घुमणार जुनी पेन्शनचा आवाज–जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

महाराष्ट्र राज्य शिक्षक नांदेड यांच्या वतीने जुनी पेन्शन,वरिष्ठ वेतन श्रेणी, वेतनवाढ,थकीत वेतन आयोग हफ्ता, नियमित पगार, वस्ती शाळा शिक्षक मूळ सेवा ग्राह्य, वैद्यकीय बील यासाठी १३ जून २०२५ रोजी जोरदार आंदोलन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे राज्य अधिवेशन मुलुंड – मुंबई येथे दि.१० फेब्रुवारी २०२५ रोजी होत आहे.सदर अधिवेशनात महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेचे प्रांताध्यक्ष तथा मुंबई शिक्षक मतदार संघाचे आमदार ज.मो. अभ्यंकर साहेबांमार्फत जुनी पेन्शन योजना याबाबत जोरदार आवाज विधानसभा सभागृहात उठवावा. यासाठी शिक्षक सेना राज्य अधिवेशनात हा मुद्दा पक्षप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या समक्ष भूमिका शिक्षक सेना नांदेडच्या वतीने मांडण्यात येणार आहे.

आजपर्यंत शिक्षक सेनेच्या मागण्या पूर्ण करण्याकरिता शिवसेनेच्या वतीने शिक्षक सेने सोबत सर्वतोपरी सहकार्य केलेले आहे,आणि यापुढेही शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यास आग्रही राहील अशी भूमिका शिक्षक सेनेचे यापुढे असेल विठू भाऊ चव्हाणराज्य उपाध्यक्ष मांडण्यात आली आहे.यांच्या वतीने महाराष्ट्र शिक्षक राज्य शिक्षक सेना अधिवेशनासाठी नांदेड जिल्हा अध्यक्ष संतोष अंबुलगेकर शिक्षक सेना नांदेड,जिल्हा परिषद शिक्षण विभाग,परशुराम येसलवाड अध्यक्ष, शिक्षक सेना नांदेड,तानाजी पवार जिल्हा अध्यक्ष खाजगी नांदेड रवि बंडेवार जिल्हा सरचिटणीस, शिक्षक सेना नांदेड, गंगाधर कदम कार्याध्यक्ष,शिक्षक सेना



नांदेड,अविनाश चिद्रवार, महेश गोविंदवार, सचिन गायकवाड, प्रकाश कांबळे जिल्हा संघटक, श्रीम.सुकन्या खांडरे मॅडम अध्यक्षा, शिक्षक सेना महिला आघाडी, श्रीम.शिवकन्या पटवे सचिव, महिला आघाडी, प्रकाश फुलवरे अध्यक्ष,शिक्षक सेना, नांदेड, बालाजी गेंदेवाड अध्यक्ष, शिक्षक सेना बिलोली संभाजी पवार अध्यक्ष, शिक्षक सेना लोहा, गोविंद आलेटवाड अध्यक्ष, शिक्षक सेना देगलुर .प्रल्हाद केंद्रे, अध्यक्ष, शिक्षक सेना माहूर दिलीप पांचाळ तालुका अध्यक्ष,कंधार , आनंदा सुर्यवंशी तालुका अध्यक्ष, उमरी, धनाजी मुंडकर, शिवराज पाटील, सतीश वाघमारे, ज्ञानेश्र्वर येंजणे सर, आश्विन वाघमारे, अमोल सुर्यवंशी,धम्मकिरण कोकणे, विजय शिंगारपुतळे, संदीप गायकवाड, मोमीन, असिफ सर, राहुल ढवळे, कपिल कावळे, भगवान गायकवाड, श्याम आवळे, शिवराज सोमवारे,अजित पाटील तालुकाध्यक्ष भोकर,प्रमोद देशमाने तालुका सरचिटणीस, देविदास जमदडे, दत्ता पेंढारकर, सोनटक्के, कदम, गणेश कोठुळे, रामदास इंदुरे तालुका संघटक, राजाराम कसलोड तालुका सरचिटणीस शिवराज गागीलगे,इरेशाम झंम्पलकर यांनी मेहनत घेतली आहे.

# बालकिर्तनकारांनी जिंकली उपस्थित भाविकांची मने

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर येथून जवळच असलेल्या दाताळा ( ता. कंधार) येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी जया एकादशी निमित्ताने किर्तन सोहळा शनिवारी दि. ८ रोजी आयोजित करण्यात आला होता. विशेष म्हणजे या सोहळ्यात बालकिर्तनकारांनी उपस्थित भाविकांची दाद मिळवली. श्री गुरू संजिवन समाधीस्थ बहीनन महाराज मंदीर प्रांगणात गुरुवर्य ह. भ. प. भाऊसाहेब महाराज जाहूरकर ( देवाची आळंदी) यांच्या मार्गदर्शनाखालील बालकिर्तनकार उस्माननगर येथील नागेश महाराज घोरबांड यांचे किर्तन आयोजित करण्यात आले होते. यावेळी दाताळा व परिसरातील अनेक गावांतून भाविकांची मोठी उपस्थिती होती. बालकिर्तनकार नागेश घोरबांड यांच्या ओघवत्या, मधुर, वाणीने श्रोते भक्तिरसात रंगल्याचे चित्र पहावयास मिळाले.

ग्रामीण भागातील अनेक गावा गावांतून अखंड हरिनाम सप्ताह, शिवनाम सप्ताह, श्रीमद्भागवत कथा, शिवकथा, यासह विविध प्रकारच्या धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. आगळे वेगळे बालकिर्तनकार नव्याने किर्तन सेवेत पदार्पण करीत आहेत. भाविकांची गर्दी बालकिर्तनकारांनाही मनापासून उत्स्फूर्तपणे दाद देत असल्याने चिमुकल्या बालकांचा उत्साह द्विगुणित होत आहे. असे दिलासादायक चित्र दिसून येते आहे.



# बुरुड समाज संघटनेचे आ.राजेश पवार यांना निवेदन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी आमदार राजेश पवार उमरी तालुका नागरि सत्कार सोहळ्याच्या निमित्ताने उमरी येथे आले असता तालुक्यातील बुरुड समाज संघटनेतर्फे आमदार साहेबांना निवेदन देण्यात आली की महाराष्ट्रातील बहुतांश समाज आर्थिक शैक्षणिक व सामाजिक दृष्ट्या बाबासाहेब त्यामुळे समाजाचा विकास व्हावा यासाठी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाच्या धर्तीवर बुरुड समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यासाठी आपण शासन स्तरावर विधानसभेत प्रश्न उपस्थित करून समाजाला



विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी सहकार्य करावे यासाठी तालुक्यातील बुरुड समाज संघटनेच्या वतीने साहेबांना निवेदन देण्यात आले. यावेळी उघडी तालुका बुरुड समाज संघटनेचे पदाधिकारी अमित पटकुटवार, शंकरराव पटकुटवार, नारायण यनगंधलवार संतोष यनगंदलवार ,संजय चितालेवार, गजानन चितालेवार , प्रभाकर पटकुटवार,अनिल यनगंधलवार आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## संपादकीय..

# योगींच्या दक्षतेने अमृतस्नान सुरक्षित



लोकनेता न्यूज नेटवर्क

प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात अग्निकांड झाल्यावर आणि त्यात ३० लोक ठार झाल्यानंतर आता प्रशासन आणि मुख्यतः योगी आदित्यनाथ सरकार अत्यंत सजग झाले आहे. योगी आदित्यनाथ यांनी परिस्थितीची समीक्षा केल्यावर तेथील देखरेख व्यवस्थेवर नव्याने पाहणी केली. योगी आदित्यनाथ यांनी प्रशासनावर संपूर्ण देखरेख ठेवतानाच अत्यंत महत्त्वाचे विधान केले आहे. ते म्हणाले की, जेथे श्रद्धा असते तेथेच सनातन धर्म असतो. वसंत पंचमीच्या दिवशी कोट्यवधी भाविक स्नान करण्यासाठी जमणार असून यावेळी कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. वसंत पंचमी ही मोठ्या प्रमाणात साजरी केली जाते आणि प्रयागराज येथे तर हा सण अत्यंत मोठ्या प्रमाणावर केला जातो. त्यामुळे हे पर्व साजरे करण्याचा दुर्मीळ योग जुळून आला आहे. उत्तर प्रदेश प्रशासन आणि स्वतः योगी आदित्यनाथ व्यवस्थेवर देखरेख करत आहेत ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. रेल्वेबरोबर समन्वय साधून भाविकांच्या येण्या-जाण्याच्या वेळेला विशेष ट्रेन्सची व्यवस्था तसेच त्यांचे आगमन वगैरे सुनिश्चित केले जावे. वास्तविक जेथे प्रचंड संख्येने भाविक येत असतात तेथे अशा घटना घडतात हे गृहीत धरून तेथे तशी काळजी घ्यावी लागते.

महाकुंभ हा १२ वर्षांनी एकदा येणारा पवित्र स्नानाचा मुहूर्त असल्याने येथे अफाट गर्दी होणार हे गृहीतच आहे. तशी व्यवस्था मोदी आणि योगी सरकारने केली होती यात काही शंकाच नाही. म्हणून तर कोट्यवधी लोक स्नानासाठी जमूनही केवळ ३० लोक मृत्युमुखी पडले. अर्थात एवढेही मृत्यू व्हायला नकोतच. पण लोकांची भक्ती आणि व्यवस्थेची दुर्बलता येथे उघड झाली हे दिसते. १९५४ आणि २०13 मध्येही अशाच दुर्दैवी घटना घडल्या होत्या आणि त्यात कित्येक लोकांचे जीव गेले होते. त्यांची पुनरावृत्ती टाळण्याचे अनेक उपाय योजले गेले. या घटनांनी गर्दीचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय बेपर्वाई यांना उघड केले गेले. यामागे भारतातच होणाऱ्या धार्मिक आयोजनांमध्ये अशा चेंगराचेंगरीच्या घटना घडतात. देशात नेहमी यात्रा असोत की कुंभ यांसारखे धार्मिक कार्यक्रम आणि त्यात होणारी लोकांची प्रचंड गर्दी हे समीकरण असतेच. त्यात या गर्दीचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणा अद्याप तितकीशी सुधारलेली नाही. त्यामुळे अशा घटना नेहमीच घडलेल्या दिसतात. यात सत्ताधारी पक्षांचा काही दोष नसतो. जो त्या वेळी सत्तेत नसतो तो त्यावेळी प्रशासनावर किंवा सरकारवर आरोप करतो. पण गर्दी इतकी अफाट असते की, कुणाचाच दोष काहीही नसतो. भारतीयांची अफवांवर विश्वास ठेवण्याची प्रचंड वृत्ती हीच कारण आहे.नुकताच जळगावजवळ एक रेल्वे अपघात घडला आणि त्यात समोरून पुष्पक एक्स्प्रेसमध्ये आग लागल्याची अफवा पसरली आणि त्यात थांबलेल्या गाडीतून हजारो प्रवाशांनी रेल्वे ट्रॅकवर धडाधड उड्या घेतल्या. त्यात पुष्पक एक्स्प्रेसखाली येऊन १५ प्रवाशांचा मृत्यू झाला. अशाच घटना अफवांवर विश्वास ठेवण्याच्या आपल्या वृत्तीमुळे घडतात. महाकुंभ यात्रेवर प्रचंड पैसा खर्च करण्यात आला आहे. पण सरकार आणि प्रशासन यात्रेदरम्यान चेंगराचेंगरीच्या घटना रोखू शकले नाही. जेथे गर्दी असते तेथे अशाच घटना होत असतात असे सांगून प्रशासन आपली जबाबदारी टाळू शकत नाही. मुस्लीम देशांतही हज यात्रेच्या दरम्यान अशाच घटना घडत असतात, पण मोदी आणि योगी सरकारसाठी हे शोभादायक नाही. योगी खासकरून देखरेख करत आहेत आणि त्यांची महाकुंभमधील आगामी कार्यक्रमांवर प्रचंड देखरेख आहे. त्यामुळे एवढे होऊनही तेथे मनुष्यहानी तितकीशी नाही. तरीही झाली ती घटना वाईट आहे आणि भविष्यात तशी घडू नये म्हणून योगी प्रशासन शक्य तितकी काळजी घेत आहे. आता महाकुंभ यात्रेवर एवढा प्रचंड खर्च करण्यात येत असूनही जनमाणसांचे नुकसान झालेच असे प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. कारण एवढी गर्दी जेथे जमते तेथे अशा दुर्घटना घडतच असतात हे गृहीत धरायला हवे. पुढे अशी घटना घडू नये याची काळजी प्रत्येकाने घ्यायला हवी.प्रयागराजमध्ये इतक्या वर्षांनंतर होणाऱ्या या महाकुंभ पर्वाला दुर्घटनांपासून वाचवू शकले नाही ही खंत आहे. एक तर १० कोटी लोक स्नानासाठी येतात आणि त्यांच्यासाठी पुरेशी व्यवस्था नव्हती असे म्हणणे योग्य नाही, पण योगी आदित्यनाथ असोत की, उतर प्रदेश प्रशासन यांची इतक्या प्रचंड संख्येने गर्दीचे व्यवस्थापन करण्याची क्षमता होती की नाही असा प्रश्न यामुळे उपस्थित झाला आहे. आता योगी सरकार काळजीपूर्वक लक्ष देऊन भविष्यात तरी अशा दुर्घटना घडू नयेत म्हणून प्रचंड लक्ष ठेवून आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. या आधीची जी चेंगराचेंगरी आणि अन्य दुर्घटना झाल्या त्यांचा अभ्यास करून प्रशासनाने परिस्थितीवर पूर्ण नियंत्रण मिळवले आहे असे योगी म्हणाले. योगी आदित्यनाथ यांनी काही दिवसांपूर्वीच महाकुंभ क्षेत्राचे हवाई सर्वेक्षण केले. लोकांचे जीव जाणे हे कुणालाच आवडत नाही आणि त्यातील राजकारणाचा भाग सोडला तर केवळ पीडितांच्या वेदना समजून घेतल्या जातात, त्यामुळे भविष्यात अशा घटना घडूच नयेत म्हणून योगी आदित्यनाथ, उत्तर प्रदेश प्रशासन पूर्णपणे सज्ज आहे. या महाकुंभसाठी जगभरातील मुत्सद्दी नेत आले आहेत आणि जगासमोर भारताची नाचक्की होऊ नये म्हणून योगी सरकारची अग्निपरीक्षा आहे हे निश्चित आहे. त्यातून ते निश्चितपणे तरून जातील.

# सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प हवा



लोकनेता न्यूज नेटवर्क

आपल्या देशाचे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज (१ फेब्रुवारी २०२५) सकाळी ११ वाजता नवीन संसद भवनामध्ये सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरा व केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचा नवीन संसद भवनातील देशाचा चौथा तर आपल्या अर्थमंत्री पदाच्या कार्यकाळातील आठवा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. त्यामुळे देशाचा सर्वात जास्त वेळा केंद्रीय अर्थसंकल्प मांडणाऱ्या नंबर वन झाल्या आहेत. मागील वर्षी 'नवरत्न' व त्या अगोदर 'सप्तर्षी' अर्थसंकल्प मांडला होता. या वर्षी देशाच्या विकासासाठी केंद्रीय अर्थमंत्री कोणत्या नवरत्नांना चालना देणार आहेत हे थोड्याच वेळात समजणार आहे. आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील पहिल्या अर्थसंकल्पाचा विचार करता आपल्या मखमली पेटारातून आणलेल्या अर्थसंकल्पात विविध योजनांसाठी मोठ्या घोषणा करण्यात आलेल्या होत्या. त्याचा फायदा देशातील किती लोकांना झाला याचे उत्तर देशातील सुजाण नागरिकांना आता शोधावे लागेल. कारण आजही देशातील गरिबातील गरीब व्यक्तीला अर्थसंकल्प समजलेला नाही. एखादी योजना गावात राबवली गेल्यावर एखाद्या नेत्याचे नाव लिहून स्थानिक नेते सांगत असतात आमच्या लोकनेत्यांनी आपल्या वाढदिवसाची भेट गावाला दिली. त्यामुळे संकल्प बाजूला राहतो आणि वाढदिवस साजरा केला जातो. अशा योजनांपासून गावकऱ्यांनी दूर राहून शासकीय योजना नि:पक्षपातीपणे राबवल्या गेल्या पाहिजेत तरच अर्थसंकल्पाचा अर्थ देशातील गरिबातील गरीब नागरिकांना समजून त्यांच्या हक्कांची जाणीव होईल.

आपला देश हा गरीब लोकांचा श्रीमंत देश आहे. त्यामुळे देशात उपलब्ध साधनसामग्रीचा योग्य प्रकारे वापर केला गेला पाहिजे. हे जर झाले असते तर आज भारत गरिबी मुक्त झाला असता. सन २०२२च्या जागतिक असमानता अहवालाचा अभ्यास केल्यास आपल्या देशात एक टक्का लोकांकडे २१ टक्के उत्पन्न व ३३ टक्के संपत्ती आहे. यावरून आपल्या देशात आर्थिक विषमता किती आहे हे सहज लक्षात येते. देशातील जी असमानता निर्माण झाली आहे ती केंद्रीय अर्थमंत्र्यांना कमी करण्यासाठी धाडसी निर्णय घ्यावे लागतील. देशातील सर्वात जास्त कर देणारे आपले महाराष्ट्र राज्य आहे. याचा विचार करता मागील अर्थसंकल्पात आपल्या राज्यातील मेट्रो विकासाला केंद्रीय अर्थमंत्र्यांनी अधिक पसंती दिली होती. यामध्ये मुंबई मेट्रोसाठी रुपये १०८७ कोटी, नागपूर मेट्रोसाठी रुपये ६८३ कोटी आणि पुणे मेट्रोसाठी रुपये ८१४ कोटींची तरतूद करण्यात आली होती. ग्रामीण रस्ते विकासासाठी रुपये ४०० कोटी, कृषी परिवर्तन प्रकल्पासाठी रुपये १५० कोटी, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प रुपये ९०८ कोटी व पर्यावरण पूरक, शाश्वत शेतीसाठी रुपये ५९८ कोटी अशा विविध तरतुदी करण्यात आल्या होत्या. तेव्हा त्यांची अंमलबजावणी करण्यात आली का? याचे मूल्यमापन होणे गरजेचे आहे. कारण या तरतुदींचा फायदा राज्यातील किती गरीब लोकांना झाला हे महत्त्वाचे आहे. तरच भारत गरिबी मुक्त होऊ शकतो. यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांना या अर्थसंकल्पात ठोस उपाय योजना कराव्या लागतील.सध्या देशात कंत्राटी हंगामी कर्मचाऱ्यांनासुद्धा वेतनासाठी संप करण्याची वेळ येत आहे. त्या दृष्टीने संकल्प करावा लागेल. शिक्षणाच्या सोयी जरी केल्या तरी पदवी संपादन केल्यावर त्याला पूर्ण वेतनी पगार व निवृत्ती वेतनाचा आधार मिळालाच पाहिजे. नोकरी देता आली नसेल तर नोकरी मिळेपर्यंत महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे बेकारी भत्ता मिळाला पाहिजे. त्यादृष्टीने केंद्रीय अर्थमंत्र्यांना तरुणाईचा देश म्हणणाऱ्या पंतप्रधानांच्या स्वप्नपूर्तीसाठी नवीन पावले उचलावी लागतील. तरच भारताच्या आर्थिक प्रगतीला गती मिळेल. तसेच शासकीय कर्मचाऱ्यांना कराच्या तावडीतून दिलासा द्यावा लागेल. महत्त्वाची बाब म्हणजे जीवनावश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवून देशातील महागाईवर नियंत्रण ठेवावे लागेल. कारण सध्या देशातील महागाईवर नियंत्रण अतिशय निकडीचे झाले आहे. आपला देश कृषी प्रधान असल्याने शेतीकडे दुर्लक्ष होणार नाही तसेच देशातील शेतकऱ्यांना आपल्या न्याय मागण्यांसाठी दिल्लीच्या वेशीवर जाण्याची वेळ येणार नाही याची काळजी केंद्रीय अर्थमंत्र्यांना घ्यावी लागेल. त्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्पात देशातील प्रत्येक घटकाचा समावेश करण्यासाठी केंद्रीय अर्थमंत्र्यांना सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प सादर करावा लागेल. तेव्हा आपले आर्थिक कारण पुढे करून लोकसभेची निवडणूक न लढविणाऱ्या देशाच्या केंद्रीय अर्थमंत्री देशाच्या विकासाला सर्वसमावेशक केंद्रीय अर्थसंकल्प सादर करून जनसामान्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी कटिबद्ध राहतील. अशी देशातील सर्वसाधारण जनतेची अपेक्षा आहे. तेव्हा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन देशातील जनतेला काय देणार हे त्यांनी नवीन संसद भवनात अर्थसंकल्पाचा पेटारा सकाळी ११ वाजता उघडल्यावर समजेल.

# महाकुंभतील दुर्घटना



लोकनेता न्यूज नेटवर्क

उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे घडलेल्या दुर्घटनेमुळे महाकुंभमेळ्याला गालबोट लागले. महाकुंभमेळ्यासाठी देशाच्या कानकोपऱ्यांतून तसेच विदेशातूनही भाविक पवित्र स्नानासाठी येत आहेत. भाविकांची ही संख्या हजारोंच्या नाही तर लाखोंच्या नाही तर करोडोंच्या घरात असल्याने प्रशासकीय यंत्रणेवर ताण निर्माण होणे स्वाभाविक आहे. प्रयागराज येथे महाकुंभ मेळ्यात सहभागी होणाऱ्या करोडो भाविकांची संख्या पाहता उत्तर प्रदेश सरकारच्या नियोजनाची खरोखरीच प्रशंसा करावी तितकी कमीच आहे. महाकुंभमेळ्यात सहभागी होणाऱ्या भाविकांनीदेखील चेंगराचेंगरी होणार नाही, दुर्घटना घडणार नाही, याबाबत सतर्कता बाळगणे आवश्यक होते. देश-विदेशातील कोट्यवधी भाविकांचे प्रयागराज भूमीवर कोणत्याही आवाहनाशिवाय किंवा निमंत्रण न देता ज्या कारणाने आगमन होते, ते निमित्त म्हणजे महाकुंभमेळा.

पद्मपुराणानुसार कुंभोत्सवाच्या दिव्य संगमाच्या वेळी प्रयागराजमध्ये स्नान करणाऱ्या भाविकांना जन्म-मृत्यूच्या बंधनातून मुक्ती मिळते, म्हणून या पवित्र ठिकाणी जाऊन स्नान, दर्शन आणि दान केल्याने भाविकांना पुण्य लाभ होतो. कुंभ राशीची गणना तीन प्रमुख ग्रहांच्या आधारे केली जाते. कालचक्रमध्ये ग्रहांचा राजा, सूर्य, राणी चंद्र आणि ग्रहांचा गुरू याला महत्त्वाचे स्थान आहे. या तीन ग्रहांचे विशिष्ट राशींमध्ये होणारे संक्रमण हा कुंभ उत्सवाचा मुख्य आधार असतो. प्रयागराजमध्ये, गुरू वृषभ राशीत आणि सूर्य मकर राशीत असल्याने, माघ महिन्यातील अमावस्येच्या दिवशी चंद्राचा मकर राशीत प्रवेश हा अत्यंत दुर्मीळ योगायोग निर्माण करतो. महाकुंभमेळ्यात मौनी अमावस्येला अनन्यसाधारण महत्त्व असते. या मौनी अमावस्येला महाकुंभमेळ्यात स्नान करण्यासाठी देशविदेशातील कोट्यवधी भाविक सहभागी झाले होते. त्यातच चेंगराचेंगरी झाली. ३० हून अधिक भाविकांचा मृत्यू झाला, शंभराहून अधिक भाविक जखमी झाले आहेत. हा प्रशासकीय आकडा असला तरी यात वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांच्या वारसांना उत्तर प्रदेश सरकारकडून ५० लाखांची मदत जाहीर करण्यात आली आहे. ही दुर्घटना घडल्यावर उत्तर प्रदेश सरकारने ज्या प्रकारे पावले उचलली, प्रशासकीय यंत्रणा राबविली, परिस्थितीवर नियंत्रण मिळविले, या सर्व घटना खरोखरीच प्रशंसनीय आहेत. मुळात कुंभमेळ्यात सहभागी कोट्यवधी भाविकांची संख्या, त्यात झालेली चेंगराचेंगरी, त्यातून निर्माण झालेली परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी योगी सरकारने राबवलेली पोलिसी यंत्रणा व जखमींवरील उपचारासाठी आरोग्य व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी राबविलेली यंत्रणा, जखमींना रुग्णालयापर्यंत विनाविलंब पोहोचविण्यासाठी काही मिनिटांमध्ये निर्माण केलेले स्वतंत्र कॉरिडॉर या एखाद्या चित्रपटातील कथानकाला साजेसे दृश्य योगी सरकारने वास्तवात साकारले.

उत्तर प्रदेशचे पोलीस, आरोग्य यंत्रणा, रस्ते व्यवस्था सांभाळणारे वाहतूक पोलीस आणि या सर्वांवर संचलन करणारे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी तसेच या सर्वांचा वेळोवेळी आढावा घेऊन मार्गदर्शन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महाकुंभ मेळ्यातील दुर्घटनेनंतर परिस्थिती आटोक्यात आणण्यासाठी उपाययोजनेतील खरे 'देवदूत' ठरले आहेत, असे म्हणणेदेखील अतिशयोक्तीचे ठरणार नाही. महाकुंभमधील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेनंतर पंतप्रधान मोदी सातत्याने मुख्यमंत्री योगी यांच्या संपर्कात होते. जखमींच्या उपचाराबाबत माहिती जाणून घेत होते. दिवसभरातील व्यस्त कार्यबाहुल्यातूनही त्यांनी उत्तर प्रदेशातील घडामोडींवर पूर्णपणे लक्ष केंद्रित केले होते. रवी, चंद्र व गुरू हे गोचरमध्ये विशिष्ट पद्धतीने योग जुळून येतो त्या त्या योगावर त्या ठिकाणी कुंभमेळा भरतो. कधी सहा वर्षे, तर कधी बारा वर्षे, तर कधी १४४ वर्षांनी हे योग येत असतात. आता जर असा योग सहा वर्षांनी आला तर त्यास अर्धकुंभ मेळा म्हणतात. जर असा योग बारा वर्षांनी आला तर तो पूर्ण कुंभ म्हटला जातो आणि असा योग जर १४४ वर्षांनी आला तर तो महाकुंभ मेळा म्हटला जातो. जानेवारी २०२५ मध्ये उत्तर प्रदेशच्या प्रयागराजच्या भूमीवर सुरू असलेला महाकुंभमेळा हा देखील १४४ वर्षांनीच आला असल्याने देशविदेशातील कोट्यवधी भाविकांचे या ठिकाणी आगमन झाले होते. भाविकांच्या स्नानासाठी उत्तर प्रदेश सरकारने प्रयागराज परिसरात असंख्य कुंडांची निर्मिती केली होती. बुधवारी मौनी अमावस्येला अमृतस्नानापूर्वी गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या संगमावर पवित्र स्नान करण्यासाठी दिवसभर मोठ्या प्रमाणात जनसमुदाय त्रिवेणी संगम परिसराकडे जात असल्याने ही दुःखद घटना घडली. ही चेंगराचेंगरी प्रयागराजमधील संगम घाटाजवळ घडली. संगम घाट हे नाव या ठिकाणाच्या आकारामुळे पडले आहे.

हे संगम घाट प्रयागराजमध्ये स्नानासाठी सर्वात महत्त्वाचे स्थान मानले जाते. असे म्हणतात की येथेच यमुना आणि सरस्वती नदी गंगेला मिळते. या ठिकाणी बहुतेक साधू-मुनी स्नान करतात. भाविकही या ठिकाणी स्नानाला सर्वाधिक महत्त्व देतात. उत्तर प्रदेश सरकारने भाविकांच्या स्नानासाठी शेकडोंच्या संख्येने घाट बनविले असतानाही संगम घाटावरच स्नान करण्याचा भाविकांचा मोह या दुर्घटनेस प्रामुख्याने कारणीभूत ठरला आहे. भाविकांना मौनी अमावस्येच्या दिनी स्नानासाठी प्रत्येक कुंभमेळ्यात वाढत चाललेली लाखोंच्या संख्येने वाढत जाणारी भाविकांची संख्या पाहता संगम घाटाचे क्षेत्र देखील प्रत्येकवेळी वाढवले जाते. २०१९ च्या तुलनेत यावेळी गर्दी पाहता संगम घाटाच्या परिसरात वाढ करण्यात आली. याआधी येथे दर तासाला ५० हजार लोक स्नान करू शकतील अशी व्यवस्था करण्यात आली होती. मात्र यावेळी महाकुंभात दर तासाला २ लाख लोकांनी स्नान करण्याची तयारी केली आहे. महाकुंभ मेळ्यात घडलेल्या दुर्घटनेमुळे जगाचे लक्ष या प्रयागराजवर केंद्रित झाले आहे.घटना घडल्यावर घटनेची समीक्षा करण्यासाठी अनेकजण आकलन करत असले तरी घटना घडल्यानंतर घटना सावरण्यासाठी, परिस्थितीवर नियंत्रण मिळविण्यासाठी उत्तर प्रदेशने राबविलेल्या उपाययोजनांची सर्वत्र प्रशंसा केली जात आहे. घटनेचे पडसाद देशाच्या कानकोपऱ्यांत उमटले असले तरी या घटनेमुळे महाकुंभमध्ये सहभागी होणाऱ्या भाविकांच्या उत्साहावर फारसा परिणाम झाला नसल्याचे दिसून येत आहे. महाकुंभसाठी स्नानादरम्यान कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होऊ नये म्हणून पाण्याच्या अंतर्गत भागातही विशेष प्रकारची उपाययोजना उत्तर प्रदेश सरकारने राबविली होती. दुर्घटना क्षणिक काळात होते; परंतु दुर्घटना घडूच नये यासाठी आयोजकांना एक-सव्वा वर्ष नियोजनाची तयारी करावी लागते. कोट्यवधींचा सहभाग असलेल्या ठिकाणी कधीही काहीही होण्याची भीती असते. नेमकी चेंगराचेंगरी झाल्याने महाकुंभवर दुर्घटनेचे सावट निर्माण झाले. आयोजन ही सरकारची जबाबदारी असली तरी दुर्घटना घडू नये ही सहभागी होणाऱ्या भाविकांचीही जबाबदारी असते, हे विसरून चालणार नाही.

# जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाच्या लातूर जिल्हा अध्यक्षपदी प्रा.तात्यासाहेब नंदवे यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर। विष्णू मोहन पोले**

लातूर :पदभूषण जेष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे संस्थापक अध्यक्ष असलेल्या राष्ट्रीय लोक आंदोलन न्यासाच्या लातूर जिल्हा अध्यक्षपदी प्रा.तात्यासाहेब नंदवे यांची निवड राळेगणसिद्धी येथे पदभूषण ज्येष्ठ समाजसेवक अण्णासाहेब हजारे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष, व राष्ट्रीय कार्याध्यक्षा श्रीमती कल्पनाताई इनामदार, सचिव अशोकराव सब्बन, कोषाध्यक्ष दत्ता आवारी, अन्सर शेख यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन निवड करण्यात आली. प्रा. तात्यासाहेब नंदवे हे गेल्या ३० वर्षांपासून जेष्ठ समाजसेवक अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन न्यास, माहिती अधिकार अधिनियम २००५ कायदा, विविध आंदोलनाच्या चळवळीत व पतसंस्था बुडीत ठेवीदारांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध आंदोलनात, जनआंदोलनात, उपोषण व सामाजिक क्षेत्रात सतत कार्यरत राहून त्यांनी लातूर जिल्ह्यामध्ये अण्णा हजारे यांच्या न्यासाचा गाव, वाडी, तांडा वस्तीवर, शहरी भागात, ग्रामीण भागात माहिती अधिकारा संदर्भातील कायदा व भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलन याची चळवळ गावोगावी पोहोचण्याचा काम आणि कार्य यांनी केले. याची दखल घेऊन या न्यासाचे संस्थापक अध्यक्ष




पदमभूषण अण्णासाहेब हजारे यांनी त्यांच्यावर लातूर जिल्हाअध्यक्ष पदाची जबाबदारी दिली असून यावेळी न्यासाचे कार्याध्यक्षा श्रीमती कल्पनाताई इनामदार, सचिव अशोकराव संब्बन, कोषाध्यक्ष दत्ता आवारी, अन्सर शेख व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीचे लातूर जिल्ह्याचे जिल्हा उपाध्यक्ष बालासाहेब गोविंदराव शिंदे अतनूरकर, ज्येष्ठ समाजसेवक तथा न्यासांचे व ग्राहक जनजागृती संघटनेचे जेष्ठ जिल्हा पदाधिकारी अनंतराव पारसेवार, उदगीर तालुका अध्यक्ष बाबा देशमुख, जळकोट तालुकाध्यक्ष बालासाहेब शिंदे, संगम डोंगरे, प्राचार्य सत्यवान भोसले, प्राचार्य व्ही.एस.कणसे, प्रा.अविनाश पाटील, शिरूर आनंतपाळचे रामदास जाधव, निलंगा चे भागवत धुमाळ, देवणी चे आनंद घोणसे, चाकूरचे संदीप नाईकवाडे, रेनापुर चे प्रकाश जाधव, आयुष्याचे जोगदंड यांनी अभिनंदन केले व स्वागत केले असून त्यांचा सत्कारही केला.

## पारितोषिक वितरण सोहळा संपन्न

# पाथफाईंडर करियर अकादमीचे कार्य गौरवास्पद–प्रा.राजेंद्र बरकसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । प्रतिनिधी**

गेल्या अनेक वर्षापासून गेवराई शहरातील मुलांना करियर मार्गदर्शन व प्रशिक्षण घेण्यासाठी बीड अथवा छत्रपती संभाजीनगर येथे जावे लागत असे . ही उणिव पाथफाईंडर करियर अकादमी ने भरून काढली . दोनच वर्षात २४+ विद्यार्थी मेहनतीने घडवून विविध क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या, ही गौरवास्पद बाब आहे ,असे प्रतिपादन जेष्ठ पत्रकार प्रा .राजेंद्र बरकसे यांनी केले . गेवराई येथील पाथफाईंडर करियर अकादमी च्या वतीने गेवराई येथील कृष्णाईनगर येथे २ फेब्रुवारी रोजी करियर मार्गदर्शन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राईम लातूर क्लासेसचे संचालक नारायण झेंडेकर हे होते . मंचावर गेवराई पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक संतोष जंजाळ , एपीआय सतीश कोटकर, प्राईम लातूर




पॅटर्न क्लासेस चे संचालक सचिन पुणेकर आणि पाथफाईंडर अकादमीचे संचालक प्रल्हाद खेत्रे, प्रशिक्षक पवन राऊत , विकास खिसाडे , किरण जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती . दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. विकास खिसाडे यांनी प्रास्ताविक केले . अकादमी च्या वतीने संपूर्ण तालुक्यात शिस्तबध्दपणे सामान्य ज्ञानावर आधारित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती . त्याचे बक्षिस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. रोख रक्कम , सन्मानचिन्हे, मातापित्यासह मुलांचा सन्मान करण्यात आला . सहभागी विद्यार्थी व विद्यार्थिनींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले . सपोनि जंजाळ व कोटकर यांनी स्वतःचं बालपण , तरुणपण संघर्ष , शालेय जीवन , क्लासेसविना शिक्षण, बिकट आर्थिक परिस्थिती , मार्गदर्शनाचा अभाव आणि मित्रांची साथ यामुळे कठिण परिस्थितीतही मार्ग शोधला . खडतर मेहनत करून पोलिस खात्यात अधिकारी झालोत . मोबाईलचा सदुपयोग करा . प्रेमाबिमाच्या लफड्यात पडू नका . आई – बापाच्या चेहऱ्याकडे पहा . ते पाहून अभ्यास करा . १६ ते १८ हेच दोन वर्ष धोक्याची आहेत . तेव्हढे स्वतःला सांभाळा . पुढे तुमचेच दिवस आहेत . मेहनतीला फळ आहे असे सांगून पुढील वाटचालीसाठी अधिकाऱ्यांनी शुभेच्छा देऊन पाथफाईंडर करियर अकादमीचे कौतुक केले . यावेळी सचिन पुणेकर व नारायण झेंडेकर यांची प्रोत्साहन देणारी भाषणे झाली . पाथफाईंडर करियर अकादमीच्या विद्यार्थिनींनी बहारदार सूत्रसंचालन केले . कार्यक्रमास अकादमीचे मुलं – मुली , स्पर्धेत सहभागी मुलं – मुली, त्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते .

# चोंडी येथे तीन दिवसीय कीर्तन महोत्सव व यज्ञ



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**प्रदीप मुंडे । धारूरक्ष**

सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थान स्थापना वर्धापन दिनानिमित्त (मंगळवार १८ ते गुरुवार २० फेब्रुवारी) दरम्यान किर्तन महोत्सव व यज्ञ सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कीर्तन महोत्सवाचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आव्हान सद्गुरु चंद्रशेखर बाबा संस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

या कीर्तन सोहळ्यामध्ये दोन दिवस रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तन होणार आहे. मंगळवारी हरिहर महाराज दिवेगावकर तर बुधवारी अर्जुन महाराज लाड गुरुजी यांचे कीर्तन होणार आहे. २० फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ वाजल्याच्या दरम्यान महंत आप्पासाहेब महाराज चौरे यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. त्याच प्रमाणे या महोत्सवा दरम्यान भजन, कीर्तन, महापुजा व इतरही धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या महोत्सवाची सांगता काल्याच्या कीर्तनानंतर भव्य महाप्रसादाची आयोजन करण्यात आले आहे. या तीन दिवशी कीर्तन महोत्सवाचा लाभ चोंडीसह परिसरातील भाविकांनी घ्यावा असे आवाहन चंद्रशेखर बाबा मठ संस्थान च्या वतीने चोंडीच्या करण्यात आले आहे हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी चोंडी येथील ग्रामस्थ व भाविक भक्त परिश्रम घेत आहेत.

# वाळूज महानगरातील वर्धमान नागरी पतसंस्थेतर्फे वारसदारांना धनादेश वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वाळूज । प्रतिनिधी**

वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था ही नेहमीच सामाजिक संस्थेच्या भावनेतून संस्था सभासदांच्या सुख दुखा:त सहभागी होत असते. तसेच संस्था नेहमीच आपल्या सभासदांच्या पाठीमागे भक्कमपणे उभी असते.

बजाजनगर शाखेतील कर्जदार विठ्ठल रावसाहेब मोरे यांना दिनांक २१- ०४-२०२३ रोजी वीस लाख रुपये गृह कर्ज देण्यात आले होते परंतु कर्जदार यांचे १३-१०-२०२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले होते, त्यांचे संस्थेने ICICI Prudential Life Insurance कंपनीमार्फत कर्ज विमा काढला होता कर्जदाराचे निधन झाल्यामुळे व घरातील कर्ता माणूस गेल्याने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. यामध्ये त्यांची आवश्यक सर्व कागदपत्रे पूर्ण करून १७,३०,८४९/- रुपये विमा दावा रक्कम वरील कंपनीमार्फत मंजूर करून मयत कर्जदाराच्या वारसदार वैशाली विठ्ठल मोरे यांना बजाज नगरचे शाखेचे सल्लागार चंद्रकांत चोरडिया यांच्या हस्ते विमा दावा रक्कमेचा धनादेश देण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शांतीलाल सिंगी ,उपाध्यक्ष पद्माकर कदम, सल्लागार विजय चौधरी , रविंद आडे , शाखा व्यवस्थापक भागवत उगले सर्व कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी उपस्थित होते.

तसेच बदनापूर शाखेतील कर्जदार श्री. नागवे भारत मधुकर यांना दिनांक १५/११/२०२४ रोजी ८४०००/- रुपये वाहन कर्ज देण्यात आले होते परंतु कर्जदार यांचे दिनांक १८/११/२०२४ रोजी अपघाती निधन झाले होते, त्यांचे सुद्धा संस्थेने ॠवळसळीं ळपीीीरपलश कंपनीमार्फत कर्ज विमा काढला होता कर्जदाराचे निधन झाल्यामुळे या परिवारावर सुद्धा दुःखाचा डोंगर कोसळला होता त्यांची आवश्यक सर्व ती कागदपत्रे पूर्ण करून ८१,२०१/-रुपये विमा दावा रक्कम वरील कंपनीमार्फत मंजूर करून मयत कर्जदाराच्या वारसदार सुनिता भारत नागवे यांना सुपूर्द करण्यात आली आहे. या प्रसंगी शाखा व्यवस्थापक किशोर जऱ्हाड, सर्व कर्मचारी व पिग्मी प्रतिनिधी उपस्थित होते.सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये कर्जदारांचा कर्ज विमा सुद्धा आपण हयात नसताना आपल्या परिवारास कोणत्याही प्रकारची आर्थिक अडचणीचा सामना करू लागू नये यासाठी अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे सर्व कर्जदारांनी आपापल्या कर्जाचा विमा काढून घ्यावा असे आवाहन अध्यक्ष डॉ. सिंगी यांनी केले.



# शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही महानाट्याचे आयोजन–आ.विजयसिंह पंडित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई । ज्ञानेश्वर उदावंत**

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात सुप्रसिद्ध ऐतिहासिक महानाट्याचे लेखक महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली.



शिवजन्म शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की २०१४ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्गणी आणि डीजे मुक्त वातावरणात हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. यापूर्वी शिवगर्जना, शिवपुत्र संभाजी, राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन करण्यात आले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही चे आयोजन करण्यात आलेले आहे. या नाटकांमध्ये राजमाता जिजाऊ म्हणून सिनेतारका अलका कुबल, छत्रपती शिवाजी महाराज सिने कलावंत शंतनू मोघे, हंबीरराव मोहिते नाट्य अभिनेते प्रकाश धोत्रे, कागा भट्ट महेश कोकाटे, संत तुकाराम महाराज रमेश रोकडे, बाजीप्रभू देशपांडे राजेश आहेर, हे भूमिका सादर करणार असून यात २५० सहभागी कलाकार सहभागी होणार आहेत. सुप्रसिद्ध लेखक तथा नाट्यनिर्माते महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या महानट्याचे ५५ फुटाचा हायड्रोलिक सेट हे वैशिष्ट्य आहे. शिवजयंतीच्या दिनी शुभारंभाचा मुख्य शो १९ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित होणार असून हा शो सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. २० फेब्रुवारी रोजी फक्त महिलांसाठी तर २१ फेब्रुवारी रोजी फक्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे. प्रेक्षकांसाठी खुर्च्याची बैठक व्यवस्था करण्यात येणार असून शिवशाही महानाट्य व शिवजन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असलेल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही साठी नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ आज शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी

जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे , आप्पासाहेब गव्हाणे, सुभाषराव मस्के, जालिंदर पिसाळ, नगरसेवक शाम येवले, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, सरपंच शितल साखरे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, सहकार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिव राहुल मस्के, सहसचिव शहादेव निकम, कोषाध्यक्ष पप्पू पठाण, सह कोषाध्य रणजित घुंबार्डे, कार्यकारणी सदस्य प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माता रमाबाई आंबेडकर यांचे जीवन महिलांसाठी प्रेरणादायी-डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

अहमदपूर दि.०७ रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावली. रमाईने आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते हे आपल्याला नाकारता येत नाही.डॉ.बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या हे सर्वश्रुत आहे. त्यांनी आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दु:ख, गरिबी यावर मात केली. डॉ.बाबासाहेबांपर्यंत दु:खाची झळ पोहचू दिली नाही. आपल्या संसारात आदर्श पत्नी,आदर्श सून,आदर्श माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्यात. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्छता नाही. अथांग दु:खाचे कधी भांडवल केले नाही त्यामुळेच माता रमाबाई आंबेडकर यांचे जीवन भारतीय महिलांसाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन युवक नेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले.

येथील माता रमाबाई आंबेडकर यांच्या पुतळ्याच्या नियोजीत जागेवर अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्षा सरस्वतीबाई कांबळे,माजी नगरसेवक शेषेराव ससाणे,रिपाई तालूकाध्यक्ष अरूणभाऊ वाघंबर,ॲड.अजय बनसोडे,माधव बनसोडे, सचिनभाऊ वाघमारे, बजरंग गायकवाड,बाळू गूळवे,बाळू बनसोडे,शकूंतला बनसोडे, सूजाताबाई बनसोडे,वेणूबाई बनसोडे,पत्रकार भिमराव कांबळे,त्रीशरण मोहगावकर,अजयभाऊ भालेराव आदींची प्रमुख उपस्थिती होती.सूरूवातीला अंजलीताई वाघंबर आणि शेषेराव ससाणे यांनी त्रीशरण,पंचशिल घेवून सामूहिक अभिवादन करण्यात आले. पूढे बोलताना डॉ.सिध्दार्थकूमार सूर्यवंशी म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब



आंबेडकर यांच्या जडणघडणीत माता रमाई यांचे योगदान अतुलनीय होते. रमाई यांनी केलेला त्याग, बाबासाहेब आंबेडकर यांना दिलेली साथ, प्रेरणा आणि त्यांच्या संघर्षांच्या काळात दिलेला पाठिंबा कौतुकास्पद आहे. रमाई यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची खूप मोठी आहे. त्यांनी बाबासाहेबांच्या सदैव सोबत राहून त्यांच्या कार्यात त्यांना प्रोत्साहित केले. बाबासाहेबांच्या महान व्यक्तिमत्त्वाचा आदर संपूर्ण जगात केला जातो. त्यांना विश्वविख्यात करण्यात रामाईंचे मोठे योगदान आहे. ज्या वेळी बाबासाहेबांना कठीण परिस्थितीत कोणी साथ देत नव्हते, त्या वेळी रमाई यांनी बाबासाहेबांची साथ कधीच सोडली नाही. डॉ. बाबासाहेबांनी भारतीय महिलांना समान हक्क मिळवून देण्यासाठी कायम प्रयत्न केले.त्याचे प्रतिबिंब संविधानात उमटले आहे. संविधानाने भारतीय महिलांना समान अधिकार आणि हक्क दिले आहेत.रमाईची प्रेरणा कायम मिळत रहावी यासाठी पूढील दोन वर्षात माता रमाई भीमराव आंबेडकर यांचा पूर्णाकृती पूतळा सर्वांच्या सहकार्याने उभार करणार असल्याचे जाहीर केले. सरणंतय गाथा घेवून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.कार्यक्रमाचे आभार सचिन बानाटे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जयंती मंडळाच्या अध्यक्षा शिलाताई शिंदे,उज्वलाताई कांबळे,रमाबाई बनसोडे,पूजा सोनकांबळे,अश्वीनी बनसोडे,अरूणभाऊ ससाणे, बौध्द नगर जयंती मंडळाचे अध्यक्षा उषाबाई बनसोडे, राणी गायकवाड संविधान कदम,रवी बनसोडे,किरण वाघमारे,आनंद सोनकांबळे,गौतम सोनकांबळे, शूभंम नावंदे, मिलींद कदम,आकाश पवार,गवळण मोरे,सुनिता कदम, सुनिता वाघमारे,शोभा पवार,पल्लवी वाघमारे आदींनी पुढाकार घेतला.

# दिल्ली विधानसभा विजयाचा कंधार भाजपने केला आनंदोत्सव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल दि.८ फेब्रुवारी २०२५ रोजी लागला असून कंधार भाजपच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला,

दिल्ली विधानसभा निवडणुकीचे निकाल लागले असुन विधानसभेच्या ७० पैकी ४९ जागेवर भारतीय जनता पार्टीने घवघवीत यश संपादन केले आहे. या विजयाचे भारतीय जनता पार्टी कंधार शाखेच्या वतीने आनंद उत्सव साजरा करण्यात आला. शहरातील महाराणा प्रताप चौकात फटाके फोडून साखर



वाटण्यात आली,या वेळी भारतीय जनता पार्टीच्या घोषणा देऊन विजय उत्सव साजरा करण्यात आले.यावेळी भाजपा तालुकाध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार,माजी जि. प .सदस्य विजय धोंडगे, व्यंकट गव्हाणे, भगवान महाराज यास, माजी प.स. सदस्य उत्तम चव्हाण, माजी पं. स. सदस्य सत्यनारायण मांनसपुरे, संभाजी घुगे, दत्ता करामुंगे, राजेश गंजेवार,सागर डोंग्रजकर, शरद भागानगरे,प्रवीण बनसोडे, केदार मुत्तेपवार, शैलेश बयास, अनिल मोरे, पांडुरंग वागमारे,भारत पाटिल चिखलीकर, शिवा पाटिल, निरंजन मोरे , चंद्रकांत घोरबांड, मनोहर मंगनाळे, गणेश ठाकुर,सुनिल राठोड यांची उपस्थिती होती.

# आजोबांच्या अमृत महोत्सव सोहळ्यात डॉ.तेजस्वी शिंदे हिच्या 'आबा' या पुस्तकाचे प्रकाशन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**

सेवानिवृत शिक्षक लक्ष्मणराव नारायणराव पुंडे सेवानिवृत्त मुख्याध्यापक यांचा ०६– २– २०२५ या दिवशी ७५ वा अमृत महोत्सव उत्साहात साजरा. सदरील कार्यक्रमास लक्ष्मणराव पुंडे यांची नात पंडितराव शिंदे सर यांची मुलगी डॉक्टर तेजस्वी पंडितराव शिंदे हिने लिहिलेले ' आबा ' गोष्ट एका खास नात्याची आजोबा आणि नातवाची ....या पुस्तकाचे माननीय डॉ. दिलीप पुंडे( सर्पदंशतज्ञ ,मुखेड भूषण.), माननीय लक्ष्मणराव




जाधव (अध्यक्ष शंकरराव चव्हाण बायो शुगर लि. डोंगरकडा), माननीय शिवानंद मिनगीरे साहेब (सहाय्यक संचालक नांदेड ), क्षीरसागर पाटील, गलांडे साहेब , मा.नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी ..सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठित नागरिक ,मित्रपरिवार व नातेवाईक यांच्या उपस्थित प्रकाशन सोहळा पार पडला.

आबा या पुस्तकात डॉ. तेजस्वी हिने आजोबांचा जीवनपट आणि आजोबा आणि नातू यांचा अतूट नातं अत्यंत भावनिक आणि उत्कृष्टरित्या व्यक्त केल आहे. आजोबा साठी नातीची ही एक अनोखी भेट ठरली आहे. आबा या पुस्तकाचे व लेखिका डॉ. तेजस्वी शिंदे हिचे सर्वत्र भरभरून कौतुक होत आहे.

# उस्माननगर भाजपतर्फे फटाके फोडून जल्लोष



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. या बद्दल उस्माननगर येथील भाजपा राष्ट्रीय परिषदेचे सदस्य व माजी सरपंच तु. शं. वारकड गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली गावातील युवा कार्यकर्त्यांनी व परिसरातील अनेक भाजपा कार्यकर्त्यांनी शनिवारी सायंकाळी बसस्थानक शेजारील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोरील प्रांगणात फटाके फोडून, मिठाई वाटून जल्लोषात आनंद व्यक्त केला.

यावेळी बालाजी पुं. पाटील घोरबांड, बसवेश्वर वारकड, बालाप्रसाद होळगे, तारक वारकड, सूर्यकांत सोनटक्के, चेअरमन संजय वारकड, सोनाजी वारकड, सुखदेव सोनटक्के, राजेश्वर मोरे, संभाजी इसादकर, भरत येडते, रामदास सोनटक्के, प्रदीप देशमुख, माजी सरपंच अमीन आदमनकर, यांच्या सह परिसरातील अनेक भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ग्रामविकास अधिकाऱ्यांच्या एकाधिकारशाही विरुद्ध आमरण उपोषण करणार- विजय ओहोळ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

श्रीगोंदा तालुक्यात मोठी ग्रामपंचायत समजली जाणाऱ्या लिंपणगाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी हे अकार्यक्षम असून मनमानी पद्धतीने ग्रामपंचायतीचा कारभार करत आहेत. त्यामुळे ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिला नसल्याने गावच्या विकास कामांना मोठी खिळ बसली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीचा कारभार रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे. विकास कामांकडेही ग्रामविकास अधिकारी जाणूनबुजून दुर्लक्ष करत असून वेळोवेळी अनुपस्थितीत राहत आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांची कामे रखडले जात आहेत. या संदर्भात गटविकास अधिकाऱ्यांना वेळोवेळी निवेदने व समक्ष भेटून देखील ग्रामविकास अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याने ग्रामसेवकावरील कारवाई संदर्भात लवकरच गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेणार असल्याचे युवक कार्यकर्ते विजय धनंजय ओहोळ यांनी गटविकास अधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.


गटविकास अधिकारी श्रीगोंदा यांना दिलेल्या निवेदनात विजय ओहोळ यांनी म्हटले आहे की; लिंपणगाव येथील सन २०१७ –१८ या आर्थिक वर्षात पंचायत समितीमार्फत गावामध्ये ए आर ओ फिल्टर बसवण्यात आले; तेव्हापासून आजपर्यंत ग्रामसेवकाला गटविकास अधिकारी यांना वारंवार अर्ज करून तसेच माहितीचा अधिकारात अर्ज देऊन देखील ए आर ओ फिल्टर चालू करण्यासाठी पत्र देण्यात आले होते. तरीदेखील ए आर ओ फिल्टर चालू झालेला नाही. या कामासाठी ग्रामविकास अधिकारी तत्पर नाही. फिल्टर चालू होत नाही. व कोणतेही विकास कामे होत नाहीत. सद्यस्थितीला दलित वस्ती मधील सार्वजनिक पाईपलाईन सध्या बंद करण्यात आली आहे. त्यामुळे या दलित वस्तीत विहिरींना पाणी असून; देखील महिला व ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. ग्रामविकास अधिकाऱ्याला समक्ष भेटल्यानंतर त्यांच्याकडून उद्धटपणे ग्रामस्थांना भाषा वापरली जाते. तसेच गावातील अनेक सिटीसर्वेच्या जागे संदर्भात न्यायालयात वाद चालू आहेत. त्या संदर्भात ग्रामविकास अधिकारी जाणूनबुजून तारखांना हजर राहत नाही. न्यायालयाचा देखील ग्रामविकास अधिकारी अवमान करतात. त्यामुळे अशा या अकार्यक्षम ग्रामविकास अधिकाऱ्यांची तातडीने बदली करा अन्यथा निलंबित करण्यात यावे; पाच दिवसात गटविकास अधिकाऱ्यांनी निवेदनाची दखल न घेतल्यास आमरण उपोषण करण्याचा निर्धार विजय ओहोळ यांच्यासह ग्रामस्थांनी घेतला आहे.

# असोसिएशन ऑफ मेडिकल ऑफिसर्स महाराष्ट्र राज्य समन्वयकपदी डॉ.ज्ञानेश्वर पाटील गायकवाड यांची निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पा.गायकवाड**

कळका ता.कंधार जि नांदेड येथील कै.संग्राम गुरुजी यांचे सुपुत्र,कळका गावची शान डॉ.ज्ञानेश्वर संग्राम पाटील गायकवाड कळकेकर सिव्हिल हॉस्पिटल परभणी यांची असोसिएशन ऑफ मेडिकल ऑफिसर्स महाराष्ट्र राज्य समन्वयक पदी निवड करण्यात आली असून नियुक्ती पत्र देऊन असोसिएशन ऑफ मेडिकल ऑफिसर्स महाराष्ट्र राज्य संघटनेत डॉ ज्ञानेश्वर पाटील गायकवाड यांचे कार्यस्थळ सर्वत्रअसेल असे सांगितले आहे.संस्थेच्या नियमांचे पालन करून वैद्यकीय



व्यावसायिक नीतिमत्तेचे तसेच भारतीय संविधान आणि वैद्यकीय अधिकारी (डॉक्टर) अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी शासन प्रशासनाला सहकार्य करून क्षेत्रात कार्यकारिणी सदस्य बनवण्यासाठी डॉ ज्ञानेश्वर पाटील गायकवाड यांची निवड झाली आहे त्यांना नियुक्ती पत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.त्यांच्या झालेल्या निवडीबद्दल दैनिक लोकनेता मराठवाडा विभागीय संपादक बाजीराव पाटील गायकवाड कळकेकर,गावकरी मंडळी, वकील,शिक्षक,पोलिस,डॉक्टर,मित्र मंडळी, आप्तेष्ट नातेवाईक आणि राजकीय नेते कार्यकर्ते पदाधिकारी यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# वानोळा येथे दारूबंदी साठी माहूरचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे आक्रमक

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**माहूर । राजकिरण देशमूख**

माहूर तालुक्यातील वानोळा येथे दारूबंदी व अवैध धंदे बंद करण्यासाठी गावातील नव तरुणांनी युवा ग्राम विकास मंडळ स्थापन केले. या युवा मंडळाने गावात तरुण मुलाची बैठक घेतली या बैठकीत दारू सह अवैध धंदे बंद करण्यासाठी चा निर्णय घेतला या निर्णयाची अमलबजावणी दुसऱ्या दिवसापासून केली. प्रथम युवकाच्या वतीने ग्रामपंचायतला निवेदन दिले, दुसऱ्या दिवशी गावात शाळकरी विद्यार्थी, कर्मचारी, गावकरी व युवा तरुणांनी गावात प्रभात फेरी काढून



जनजागृती केली.तिसऱ्या दिवशी पोलीस स्टेशन माहूर व वरिष्ठांकडे लेखी निवेदन दिले.या निवेदनाची तात्काळ दखल माहूरचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांनी घेतली आणि पोलीस ताफ्यासह वानोळा येथील दोन दारू विक्री करणाऱ्यांना ताब्यात घेतले. अनेक घरांची झडती घेतली मात्र जनजागृती अगोदरच झाल्याचे कारणाने इतर ठिकाणी दारू सापडली नाही.गावात पोलीस ताफा पाहताच गावकरी मंडळींना उत्साह आला. यावेळी माहूरचे ठाणेदार शिवप्रकाश मुळे यांनी गावकऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी उपसरपंच अभिजीत राठोड, कृष्णकुमार राठोड, सुदाम चव्हाण, पत्रकार पंडित धुप्पे,युवा विकास ग्रुपचे सर्व तरुण मंडळी व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते तर पोलीस ताफ्यात ठाणेदार शिवप्रकाश मुळे, सपोनि ब्राह्मण, सपोनि गायकवाड, बीट जमादार गेडाम,गजानन जाधव, गजानन चौधरी, पोलीस कर्मचारी पुसनाके मॅडम, राठोड मॅडम, भोपळे यांनी महत्वाची कामगिरी केली याबद्दल गावकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904